अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,

आस्थापना विभाग, पुणे मनपा.

जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/2040

दिनांक :- 04/06/2021

-: आदेश :-

विषय :- **कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.**
स्वतःचे ओळखपत्र नसणारे नागरिकांचे लसीकरणासाठी Key Facilitator नियुक्त करणेबाबत.

संदर्भ :-
१) साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महापालिका आयुक्त कार्यालय जा.क्र. मआ/साप्रवि/१३४५ दि.१८/०५/२०२१

पुणे शहरामध्ये कोरोना विषाणूचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होत आहे वेगवेगळ्या स्तरावर यासाठी कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे. याअंतर्गत पुणे शहरातील नागरिकांना कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात येत आहे.

त्यानुसार स्वतःचे ओळखपत्र नसणारे नागरिक (उदा.आदिवासी समाज, किन्नर समाज, भटके समाज, साधूसंत, विविध धर्मांचे महंत, तुरुंगवासी, मनोविकास रुग्णालयातील बांधव, वृद्धाश्रमातील नागरिक, रोड भिक मागणारा समाज, सुधारणागृहात, शिबिरात राहणारे व्यक्ती व यासारखे इतर व्यक्ती ज्यांचे वय लसीकरणासाठी पात्र आहेत परंतु स्वतःचे ओळखपत्र नसणारे अशा सर्व १८ वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण करून घेण्यासाठी श्री. रामदास रायाजी चव्हाण, मुख्य समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांची Key Facilitator म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

मुख्य समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग यांनी वरील गटातील नागरिकांचे लसीकरण करणेकरिता आरोग्य विभागाकडील लसीकरण नोडल ऑफिसर यांचेशी समन्वय साधून अशा लोकांकरिता लसीकरण सत्र आयोजित करावे.

(रुबल अग्रवाल)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका

प्रत –
१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका,
२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/इ), पुणे महानगरपालिका
यांना माहितीस्तव...

90 F:\Documents\Correspondence Corona.docx